प्रेसनोट तारीख ०३/११/२०१७.

"आय.ए.एस. अधिकाऱ्यांकडे १० कोटी रूपयांची खंडणी मागणाऱ्या गुन्हेगारास खंडणी विरोधी पथकाकडून अटक"

महाराष्ट्र शासनाचे सनदी अधिकारी श्री. राधेशाम लक्ष्मणराव मोपलवार (भा.प्र.से) यांचे भ्रष्टाचारा बाबत इसम नामे सतीष सखाराम मांगले याने एक संदिग्ध ध्वनीफित (ऑडिओ) दिनांक ०१/०८/२०१७ रोजी एका वृत्तवाहिनीवर प्रसारीत केली होती. त्यानंतर सतीष सखाराम मांगले व त्याची दुसरी पत्नी सौ. श्रध्दा मांगले हया विविध पक्षाच्या राजकीय नेत्यांना भेटुन तसेच प्रसारमाध्यमांच्या प्रतीनीधींना भेटून सातत्याने आरोप करीत होते. त्या दोघांनी अनेक शासकीय कार्यालयात श्री. राधेशाम मोपलवार यांचे विरूध्द तक्रारी केल्या होत्या.

त्यानंतर २३ ऑक्टोंबर २०१७ रोजी सतीष मांगले, पत्नी श्रध्दा मांगले व मित्र अनिल वेदमेहता यांनी श्री. मोपलवार यांच्या ओळखीचा श्री. क्लिंग मिश्रा याचे मार्फत संपर्क साधुन त्यांना नाशिक महामार्गावरील खारेगांव टोल नाका येथे बोलावून तेथे श्री. राधेशाम मोपलवार यांचे विरूध्द केलेले सर्व भ्रष्टाचाराचे आरोप परत घेणेसाठी तसेच स्वत:कडे असलेले कॉल रेकॉर्डींग परत करण्यासाठी त्यांचेकडे १० कोटी रूपयांची खंडणीची मागणी केली. तसेच त्यांचेबरोबर शांघरीला हॉटेल , वरपे भिवंडी येथे पुन्हा चर्चा करून सतीष मांगले, श्रध्दा मांगले व अनिल वेदमेहता यांनी पुन्हा श्री. मोपलवार यांचेकडे १० कोटी रूपयांची खंडणीची मागणी केली. दिनांक ३१/१०/२९०१७ रोजी सतीष मांगले, पत्नी श्रीध्दा मांगले हिचेसह पुन्हा जे.डब्ल्यु. मेरीअट कॅफे हॉटेल, मुबई येथे रात्रौ ८:०० ते ९:०० वाजता श्री. मोपलवार यांचेशी चर्चा करून ७ कोटी रूपयां पर्यंत तडजोड करण्यास सांगीतले. ७ कोटी रूपये न दिल्यास तसेच पोलीसात तक्रार केली तर श्री. मोपलवार व त्यांची मुलगी तन्वी असे आम्हा दोघांना त्याचे सानिध्यात असलेल्या गुन्हेगारी टोळीतील गुन्हेगारांना सांगुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली.

सतीष मांगले याचे १० वी पर्यंत शिक्षण झाले असुन त्याने कॉम्प्युटर मध्ये डिप्लोमा केलेला आहे परंतु सदरचा डिप्लोमा अर्धवट सोडून प्रायवेट डिटेक्टीवचे काम सुरू केले होते. त्यास वरिष्ठ अधिकारी यांचेशी संबंध ठेवून त्यांचे फोनवरील संभाषण रेकॉर्डीग करण्याची सवय आहे. त्याचे विध्द बांद्रा पोलीस ठाणे येथे आय.टी.ॲक्ट नुसार (गु.र.क्र. ७४/२०१२) तसेच खंडणीचा गुन्हा दाखल आहे. तसेच मिरा रोड येथे बलात्काराचा गुन्हा दाखल आहे.

काल दिनांक ०२/११/२०१७ रोजी जुलमाने मागीतलेल्या ७ कोटी रूपये खंडणीच्या रक्कमे पैकी १ कोटी रूपये खंडणीची रक्कम सतीष मांगले याने भाडयाने रहात असलेल्या घरी डोंबिवली पुर्व, मानपाडा–निळजे, लोढा पालवा, रिव्हर व्हयुव एफ, सतरावा माळा, फ्लॅट नंबर १७०१येथे स्विकारतांना त्यास खंडणी विरोधी पथकाने रंगेहाथ पकडले आहे. त्याचे कडुन दोन लॅपटॉप, ५ मांबाईल हॅण्डसेट, ४ पेनड्राईव्ह, १५ सी.डी व अनेक आक्षेपार्ह कागदपत्रे मिळाली आहेत.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त श्री. परमबीर सिंग, मा. सह पोलीस आयुक्त श्री. मधुकर पांडेय, मा.अपर पोलीस आयुक्त गुन्हे श्री मकरंद रानडे, मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री. सुनिल भारव्दाज, मा. सहा. पोलीस आयुक्त, शोध–२ गुन्हे शाखा श्री. एन.टी. कदम यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.प्रदीप आर. शर्मा, पो.निरी.श्री.राजकुमार कोथमिरे, व खंडणी विरोधी पथकाचे पोलीसांनी पार पाडली आहे.


महाराष्ट्र पोलीस
पोलीस आयुक्तालय, ठाणे


महाराष्ट्र पोलीस
पोलीस आयुक्तालय, ठाणे